नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - ३४९ Issue - 349 | वार गुरुवार दि. ८ मे २०२५ Blow- Thursday Date 8 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# ऑपरेशन सिंदूर

# भारताने पाकिस्तानी दहशतवादी अड्ड्यांवर २४ क्षेपणास्त्रे डागली

## पहलगाम हल्ल्याचा घेतला बदला; १०० हून अधिक दहशतवादी ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : जम्मू-काश्मीरमधील पहलगामच्या हल्ल्यांनंतरच्या पंधरा दिवसांनी भारताने या भ्याड हल्ल्याच्या प्रत्युतरादाखल मंगळवारी मध्यरात्रीनंतर 'ऑपरेशन सिंदूर' ही पहिली धडक लष्करी मोहीम राबविली. भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाने एकत्रितपणे पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीर (पीओके) मधील पाकिस्तानी दहशतवादी अड्ड्यांवर किमान २४ क्षेपणास्त्रे डागून ही प्रखर सैन्य कारवाई केली. केवळ या काही मिनिटांच्या हवाई हल्ल्यांत पाकिस्तानमधील किमान ९ दहशतवादी अड्डे भारताने उध्वस्त केले. हे ९ पाकिस्तानी दहशतवादी अड्डे उध्वस्त करण्याची मोहीम फत्ते करण्यासाठी हवाई दलाच्या सुखोई व राफेल या लढाऊ विमानांना केवळ ७ मिनिटे (मंगळवारी मध्यरात्री १:०४ ते १:११ ) लागली. संपूर्ण मोहीम पार पडण्यासाठी एकूण २५ मिनिटे लागल्याचे लष्कराने म्हटले आहे.

अंतिम क्षणापर्यंत अत्यंत गोपनीय पध्दतीने पार पाडलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' या पूर्ण मोहीमेवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः रात्रभर लक्ष ठेवले होते. सध्याची युध्दजन्य परिस्थती पहाता पंतप्रधानांनी त्यांचा आगामी युरोप दौराही रद्द केला आहे. बुधवारी सकाळी हल्ला केला. संरक्षण मंत्रालयाच्या माहितीनुसार पहलगाम हल्ल्याच्या प्रत्युत्तरादाखल भारताने केलेल्या या पहिल्या हल्ल्याचा २ मिनिटांचा व्हिडिओ दिल्लीतील राष्ट्रीय माध्यम केंद्रात पत्रकारांना दाखवण्यात आला.

भारतीय सैन्याने पहलगामनंतर केलेल्या या पहिल्याच हवाई हल्ल्याने पाकिस्तानचे कंबरडे मोडले आहे. या दहशतवादी अड्ड्यांमध्ये दडून बसलेले व हल्ल्यांत मारले गेलेले दहशतवादी व त्यांचे कुटुंबीय यांची संख्या किमान २६ ते कमाल ९० इतकी सांगण्यात येत आहे. भारतात दहशतवादी कारवायांना प्रोत्साहन देणाऱ्या जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तैयबाच्या दहशतवादाच्या कारखान्यांवरच मुख्यतः हा हल्ला करण्यात आला. मुजफ्फराबाद, बहावलपूर आणि मुरीदकेसह एकूण ७ शहरांमधील ९ ठिकाणी हवाई हल्ले



करण्यात आले. जैश-ए-मोहम्मदच्या मरकज सुभान अल्ला या मुख्यालयासह ४ अड्डे तसेच लष्कर-ए-तोयबाचे ३ आणि हिजबुल मुजाहिदीनचे २ दहशतवादी अड्डे उध्वस्त झाले आहेत. भारतातील अनेक दहशतवादी हल्ल्यांचा मास्टरमाईंड असलेल्या मसूद अजहर या एकाच दहशतवादी म्होरक्याचे किमान १० ते १४ नातेवाईक या हल्ल्यात मारले गेले आहेत. पाकिस्तानने या हवाई हल्ल्यानंतर बुधवारी देशभरात आणीबाणी लागू केली असून सर्व विमानतळेही तडकाफडकी बंद केली आहेत. राजधानी इस्लामाबादसह अनेक मुख्य शहरांतील सर्व सरकारी आणि खाजगी शाळा, महाविद्यालये, अनेक सरकारी कार्यालये बंद करण्यात आली आहेत.

दरम्यान अमेरिकेतील भारतीय दूतावासाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की या हवाई हल्ल्यांनंतर भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांच्याशी लगेच चर्चा केली व त्यांना भारताच्या प्रत्युत्तर कारवाईची माहिती दिली. पाकिस्तान समर्थित दहशतवाद्यांनी यंदा २२ एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मीरमध्ये केलेल्या क्रूर आणि घृणास्पद हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला. या हल्ल्यात पाकिस्तानस्थित दहशतवाद्यांचा स्पष्ट सहभाग असल्याचे भारताकडे ठोस पुरावे, तांत्रिक माहिती, पीडितांचे जबाब आणि इतर पुरावे आहेत असेही निवेदनात म्हटले.

दरम्यान पाकिस्तानी सैन्याने सीमेवरील कुरापती सुरू ठेवताना नियंत्रण रेषा आणि आंतरराष्ट्रीय सीमेवर मंगळवारी रात्रीही तोफखान्याद्वारे गोळीबार केला. यात तीन भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला आहे. ऑपरेशन सिंदूर च्या नंतर जम्मू, सांबा, कठुआ, राजौरी आणि पूंछमधील सर्व शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्था बुधवारी बंद राहतील. पाक सीमेजवळील करतारपूर कॅरिडोर बंद करण्यात आला आहे. पाकबरोबरच्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारताने पाकिस्तानच्या सीमेवरील राज्यांमधील सर्व उड्डाणे पुढील सूचना येईपर्यंत रद्द केली आहेत. यामध्ये जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, पंजाब, गुजरात आणि राजस्थान यांचा समावेश आहे. भारताने ७ राज्यांमधील ११ विमानतळांवरील विमान वाहतूक बंद केली आहे. श्रीनगर, जम्मू, श्रीनगर, लेह, चंदीगड, बिकानेर, जोधपूर, राजकोट, धर्मशाला, अमृतसर, भुज आणि जामनगरमध्ये उड्डाणे थांबवण्यात आली आहेत. हे विमानतळ पाकिस्तान सीमेला लागून आहेत. एअर इंडिया, इंडिगो आणि स्पाइसजेट यांनी प्रवाशांसाठी सूचना जारी केल्या आहेत. महत्त्वाच्या संस्था, इमारती आणि संवेदनशील क्षेत्रांसाठी सरकार आणखी काही पावले उचलू शकते असे सरकारतर्फे बुधवारी सकाळी स्पष्ट करण्यात आले.

**ऑपरेशन सिंदूर मध्ये उध्वस्त केलेले दहशतवादी अड्डे –**

१. मरकज़ सुभान अल्लाह (बहावलपूर)

२. मरकज़ तैयबा, (मुरीदके)

३. सरजाल/तेहरा कला

४. महमूना जोया सविधा (सियालकोट)

५. मरकज़ अहले हदीस (बरनाला भिम्बर, पंजाब)

६. मरकज़ अब्बास (कोटली)

७. राहील शाहिद मदरसा, (जि. कोटली)


८. शावई नाला कैम मदरसा (मुजफ्फराबाद)

९. मरकज सैयदना बिलाल

ऑपरेशन सिंदूर मध्ये सुखोई-३० आणि राफेल लढाऊ विमानांचाही वापर करण्यात आला. फ्रान्सच्या दासो कंपनीने बनवलेले व दोन इंजिने असलेले राफेल हे बहुउद्देशीय लढाऊ विमान लेह सारख्या उंच भागातूनही पूर्ण क्षमतेने उड्डाण करू शकते. ते हवेतून हवेत आणि हवेतून जमिनीवर हल्ले करू शकते. राफेलमध्ये उल्का, खांदे आणि हॅमर क्षेपणास्त्रे आहेत. सुखोई-३० हे देखील एक बहुउद्देशीय लढाऊ विमान आहे. हे देखील एक ट्विन इंजिन फायटर जेट आहे. यावरून सुपरसॉनिक क्षेपणास्त्र ब्रह्मोस देखील सोडता येते. सुखोई-३० हे लढाऊ विमान ५७ हजार फूट उंचीवर पोहोचू शकते. त्यातील १२ हार्ड पॉइंटसद्वारे ते १२ शस्त्रास्त्रे वाहून नेऊ शकते. ते एकाच वेळी हवेतून हवेत आणि हवेतून जमिनीवर मारा करणारी शस्त्रे वाहून नेऊ शकते आणि गोळीबार करू शकते.

# पाकिस्तानशी लढण्याचा उद्देश नाही, केवळ दहशतवाद्यांची ठिकाणं केली उद्ध्वस्त; एअरस्ट्राइकनंतर भारतीय लष्कराचं मोठं विधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : जम्मू - काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याला भारताने मंगळवारी मध्यरात्री प्रत्युत्तर देत पाकिस्तानच्या ९ दहशतवादी ठिकाणांवर एअरस्ट्राइक केला. भारतीय लष्कर आणि हवाई दलाने मिळून केलेल्या या कारवाईनंतर संरक्षण मंत्रालयाने एक प्रेस रिलीज करत याबाबत माहिती दिली. यात संरक्षण मंत्रालयाने सांगितलं, की 'ऑपरेशन सिंदूर'चा उद्देश फक्त दहशतवाद्यांच्या ठिकाणांवर हल्ला करणं होता. भारताने केलेला हल्ला शेजारी देशाशी लढण्याच्या उद्देशाने करण्यात आलेला नाही.

संरक्षण मंत्रालयाने 'ऑपरेशन सिंदूर'ची माहिती देत सांगितलं, की 'काही काळापूर्वीच, भारतीय सशस्त्र दलांनी 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केलं, यात पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवादी पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्यात आलं, जिथून भारताविरुद्ध दहशतवादी हल्ले आखले जात होते आणि ते अंमलात आणले जात होते. एकूण ९ ठिकाणांवर निशाणा साधण्यात आला. यात आमची कृती चिथावणीखोर नाही. कोणत्याही पाकिस्तानी लष्करी आस्थापनेला लक्ष्य केलेलं नाही. या हल्ल्यात कोणतीही पाकिस्तानी लष्करी मालमत्ता लक्ष्य करण्यात आली नाही. भारताने आपले लक्ष्य निवडण्यात संयम बाळगला आहे.'

संरक्षण मंत्रालयाने प्रेस रिलीजमध्ये पुढे म्हटलं आहे की, 'पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर ही पावलं उचलण्यात आली आहेत. पहलगाम हल्ल्यात २५ भारतीय आणि एका नेपाळी नागरिकाचा मृत्यू झाला होता. 'ऑपरेशन सिंदूर' बद्दल सविस्तर माहिती नंतर दिली जाईल.'

भारताकडून झालेल्या या हल्ल्यानंतर पाकिस्तानकडून पीओके आणि नियंत्रण रेषेवर गोळीबार करण्यात आला. पाकिस्तानी सैन्याने नियंत्रण रेषेवरील आणि जम्मू-काश्मीरच्या विरुद्ध असलेल्या आंतरराष्ट्रीय सीमावरील चौक्यांवरून तोफखान्याचा मारा करुन अंदाधुंद गोळीबार केला. अंदाधुंद गोळीबारात तीन निष्पाप नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले. भारतीय सैन्य योग्य पद्धतीने प्रत्युत्तर देत आहे.

# २२ माओवाद्यांना कंठस्नान; छत्तीसगडच्या 'ऑपरेशन कगार'मधील मृतांची संख्या २६वर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गडचिरोली: महाराष्ट्राच्या सीमेपासून अवघ्या ५० किलोमीटर अंतरावर असलेल्या छत्तीसगडमधील करेगुट्टाच्या पहाडावर सुरक्षा दलाच्या जवानांनी बुधवारी २२ माओवाद्यांना कंठस्नान घातले. 'ऑपरेशन कगार' अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या विशेष अभियानात सुमारे २४ हजार जवान सहभागी झाले आहेत. या अभियानात आजवर २६ माओवाद्यांना ठार मारण्यात जवानांना यश आले आहे. माओवाद्यांविरोधातील आजवरचे देशभरातील हे सर्वांत मोठे अभियान मानले जात आहे.

छत्तीसगडच्या बिजापूर आणि तेलंगणमधील मुलूग तथा भद्राद्री-कोठागुडेम परिसरात जवळपास आठशे चौरस किलोमीटरमध्ये करेगुट्टाचा उंच पहाड, घनदाट जंगलाचा परिसर आहे. अबुझमाड आणि इंद्रावती नॅशनल पार्कमध्ये सुरक्षा दलांनी आक्रमक भूमिका घेतल्यानंतर, करेगुट्टाच्या परिसरात माओवाद्यांनी तळ ठोकला. माओवाद्यांच्या सर्वांत मजबूत पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मीच्या (पीएलजीए) बटालियन क्रमांक १चा हा सुरक्षित तळ मानला जातो. काही दिवसांपूर्वी तेलंगण राज्य समिती आणि दंडकारण्य स्पेशल झोनल समितीचे पाचशेहून अधिक माओवादी आपल्या नेत्यांसह या भागात बैठकीसाठी एकत्र आले. यात प्रामुख्याने जहाल माओवादी हिडमा, पीएलजीए बटालियनचा कमांडर देवा, दामोदर, केंद्रीय समिती सदस्य चंद्रना, रामचंद्र रेड्डी, सुजातासह दंडकारण्य झोनल समितीचे नेते आणि माओवाद्यांच्या कंपन्यांचे कमांडर यांचा समावेश आहे.

याविषयीची माहिती मिळताच माओवादविरोधी अभियान राबविण्यात आले. या अभियानात जिल्हा राखीव दल, बस्तर फायटर्स, छत्तीसगड पोलिसांचे एसटीएफ, सीआरपीएफ आणि 'कोब्रा'चे जवान सहभागी झाले आहेत. पहिल्या दिवशीच्या चकमकीत तीन माओवादी ठार झाले होते. यानंतर जवानांनी नीलम सराय आणि धोबे पहाडावर तिरंगा फडकावला. पहाडावरील माओवाद्यांचे बंकर आणि गुफाही ताब्यात घेतली.

दोन दिवसांपासून पहाडावर आणि पायथ्याशी अभियान तीव्र करण्यात आले आहे. मंगळवारी रात्रीपासून सुरू असलेल्या चकमकीत २२ माओवादी ठार झाले. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठाही जप्त करण्यात आला आहे. बस्तरमधील माओवादविरोधी अभियानात सुरक्षा दलाच्या जवानांनी मागील चार महिन्यांत १५१ जहाल माओवाद्यांना ठार मारले आहे.

करेगुट्टाच्या पहाडावर माओवाद्यांनी पेरून ठेवलेले आयईडी स्फोटके निष्क्रिय करीत असताना दोन जवान आणि कोब्रा बटालियनचे सहाय्यक कमांडंट सागर बोराडे (३३) जखमी झाले आहेत. कल्याणचे मूळ रहिवासी असलेले सागर यांच्यावर दिल्लीच्या रुग्णालयात उपचार करण्यात आले. या घटनेत त्यांनी आपला पाय गमावला. माओवाद्यांनी पेरून ठेवलेली २५० आयईडी स्फोटके आजवर जवानांनी नष्ट केली आहेत. ऑपरेशन कगारमध्ये जवानांकडून अत्याधुनिक ड्रोनचा वापर केला जात आहे. या ड्रोनमध्ये पहाडावर फिरणारे माओवादी दिसून आले.

## लष्कर-ए-तैयबाचे मुख्यालय उद्धवस्त, मसूद अजहरचे मदरसे जमीनदोस्त

## भारताकडून पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर

# जैशचा प्रमुख दहशतवादी मसूद अझहरच्या मदरशावर हल्ला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारताने पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर देत पाकिस्तानविरोधात ऑपरेशन सिंदूरअंतर्गत मोठी कारवाई केली आहे. भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाने मिळून पाकिस्तान आणि पीओकेच्या ९ दहशतवादी ठिकाणांवर एअरस्ट्राइक केला. भारताने पाकिस्तानच्या ताब्यातील काश्मीरमध्ये असलेल्या लश्कर-ए-तोयबाचं हेडक्वार्टर नष्ट केलं आहे. पाकिस्तानकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, भारताने पाकिस्तानच्या नियंत्रणाखालील अनेक भागात क्षेपणास्त्रे डागली, यात एका मुलासह किमान आठ जणांचा मृत्यू झाला. दोन आठवड्यांपूर्वी झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ही कारवाई केली आहे.

भारताने या एअरस्ट्राइकची माहिती देताना म्हटलंय, की दहशतवाद्यांनी वापरलेल्या पायाभूत सुविधांवर हल्ला करण्यात आला आहे. लष्कर-ए-तैयबाचं दहशतवादी लपण्याचं ठिकाण मरकज-ए-तैयबा उडवून देण्यात आलं आहे. भारताने हा हल्ला पीओकेच्या मुरीदके येथे केला आहे, जिथे दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिलं जात होतं.

भारताने उद्धवस्त केली लष्कर-ए-तैयबाची ठिकाणं

भारताने पाकिस्तान आणि पीओकेवरील ९ ठिकाणी एअरस्ट्राइक केला. बहावलपूर, मुरीदके, गुलपुर, भींबर, चक अमरू, बाघ, कोटली, सियालकोट आणि मुजफ्फराबाद अशा



९ ठिकाणांवर हल्ला केला. मात्र भारतीय संरक्षण मंत्रालयाने स्पष्ट केलं की हे हल्ले केवळ दहशतवादी ठिकाणांवर केले असून पाकिस्तानी लष्करी तळांना कोणतंही नुकसान झालं नाही.

घटनास्थळावरुन समोर येणाऱ्या फोटो, व्हिडिओमध्ये दहशतवादी ठिकाणं उद्धवस्त झाली आहेत. दहशतवाद्यांची ठिकाणं जळताना दिसत आहेत. पाकिस्तानच्या निओ न्यूजच्या वृत्तानुसार, जैशचा प्रमुख दहशतवादी मसूद अझहरचे जन्मगाव असलेल्या बहावलपूरवर हल्ला झाला असून मसूद अझहरच्या मदरशावर चार गोळे पडले आहेत. त्यामुळे मदरसे जळत आहेत. पोलिसांकडून बचावकार्य सुरू आहे. मोठ्या संख्येने सुरक्षा एजन्सी तिथे पोहोचल्या आहेत. शहरातील सर्व रस्ते बंद करण्यात आले आहेत. मसूद अझहरचे चार मदरसे पूर्णपणे उद्धवस्त झाले आहेत. गेल्या महिन्यात भारताच्या ताब्यातील काश्मीरमध्ये पर्यटकांवर केलेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर दोन्ही देशांमधील तणाव वाढला आहे. त्यानंतर भारताने मंगळवारी मध्यरात्री कठोर कारवाई केली. भारताने या दहशतवादी हल्ल्याला पाठिंबा दिल्याचा आरोप पाकिस्तानवर केला आहे, जो इस्लामाबादने नाकारला आहे.

भारताच्या एअरस्ट्राइकनंतर पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी भारताने केलेल्या हल्ल्यांचा निषेध करत म्हटलं, की 'धोकेबाज शत्रूने पाकिस्तानमध्ये पाच ठिकाणी भ्याड हल्ले केले आहेत आणि त्याला देश प्रत्युत्तर देईल. भारताने लादलेल्या या युद्धाच्या कृतीला पाकिस्तानला कडक प्रत्युत्तर देण्याचा पूर्ण अधिकार आहे आणि खरोखरच कडक प्रत्युत्तर दिलं जात आहे'.

## संपादकीय....

### अखेर न्याय झाला!

पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याला भारताने उत्तर दिलं आहे. भारतीय वायुसेनेने पाकिस्तान आणि पाकिस्तानमध्ये 'ऑपरेशन सिंदूर' केले आहे. या ऑपरेशनमध्ये ९ दहशतवादी ठिकाणांवर हल्ला करण्यात आला. हे हल्ले पहाटे १:३० च्या सुमारास बहावलपूर, कोटली आणि मुजफ्फराबादमध्ये झाले. ऑपरेशन सिंदूरने दहशतवादी हल्ल्यामध्ये मृत्यू झालेल्या लोकांना खऱ्या अर्थाने न्याय मिळाला आहे. या हल्ल्याचा बदला घेण्यासाठी हे ऑपरेशन करण्यात आले. पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यात २५ भारतीय आणि १ नेपाळी नागरिकांचा जीव गेला होता. भारतीय वायुसेनेने हे हल्ले करण्यापूर्वी देशभरात ३०० ठिकाणी मॉक ड्रिल केले होते. यानंतर, त्यांनी थेट पाकिस्तानात घुसून दहशतवाद्यांना मारले. पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यात २६ पर्यटकांना जीव गमवावा लागला होता. या हल्ल्यासाठी जबाबदार असणाऱ्यांना सोडणार नाही, असा इशारा भारताने दिला होता. त्यानुसार, कारवाई करत भारत सरकारने आपली जबाबदारी पूर्ण केली आहे. 'ऑपरेशन सिंदूर'बद्दल लवकरच आणखी माहिती दिली जाईल. ऑपरेशन सिंदूर'बद्दल लवकरच माहिती दिली जाईल, असे पीआयबीने म्हटले आहे. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी बैसरन व्हॅलीमध्ये हल्ला केला होता. यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्यामुळे संपूर्ण देश हादरला होता. या हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतीय वायुसेनेने पाकिस्तानात घुसून दहशतवाद्यांना कंठस्नान घातले. भारताने या कारवाईद्वारे दहशतवाद्यांना स्पष्ट संदेश दिला आहे. तो संदेश असा आहे की, दहशतवादी कुठेही लपले तरी, भारत त्यांना शोधून मारणार. 'ऑपरेशन सिंदूर' हे भारताच्या धैर्याचे आणि सामर्थ्याचे प्रतीक आहे. या कारवाईमुळे भारताची प्रतिमा जगात आणखी उंचावली आहे. भारतीय वायुसेनेने दाखवून दिले आहे की, ते आपल्या देशाचे रक्षण करण्यासाठी सज्ज आहेत. 'ऑपरेशन सिंदूर' हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. या कारवाईमुळे देशातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. 'ऑपरेशन सिंदूर' हे फक्त एक लष्करी कारवाई नाही, तर दहशतवादाविरुद्धच्या लढाईतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या कारवाईमुळे भारताने जगाला दाखवून दिले आहे की, तो दहशतवादाला कधीही सहन करणार नाही.

# पंढरपूरात ९ व १० मे रोजी 'समता संस्कार शिबिरा'चे आयोजन

## पंढरपूरच्या संत विचारपीठ व साने गुरुजी स्मारक समिती यांचा उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- 'संत विचारपीठ, पंढरपूर व परमपूज्य साने गुरुजी स्मारक समिती, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने पंढरपूर मध्ये 'समता वारी २०२५' या 'समता संस्कार शिबिरा'चे आयोजन केले असून याचा सर्वांनी लाभ घ्यावा.' असे आवाहन संत विचारपीठ पंढरपूर व परमपूज्य साने गुरुजी स्मारक समिती, पंढरपूर यांच्या वतीने कळविले आहे.

येत्या शुक्रवारी दि.९ मे व शनिवारी, दि. १० मे २०२५ या दोन दिवशी 'समता वारी संस्कार शिबिरा'चे आयोजन केले आहे. यामध्ये गुरुवार,दि. ८ मे २०२५ रोजी सायंकाळी पाच ते सात वाजेपर्यंत मंगळवेढ्यातील श्री. संत चोखामेळा समाधी स्थळ या ठिकाणी भजन व श्री. संत चोखामेळा यांची अभंगवाणी, गाथा तसेच श्री. संत दामाजीपंत यांच्या स्मारकापर्यंत दिंडी सोहळ्याचे भव्य आयोजन केले आहे. शुक्रवार, दि.९ मे २०२५ रोजी सायं. पाच ते आठ वाजेपर्यंत पंढरपूर मधील जुना कासेगाव रोड लगत असलेल्या 'लोटस इंग्लिश स्कूल' मध्ये 'सामाजिक वास्तव आणि प.पू.साने गुरुजी यांच्या स्वप्नातील भारत' परिसंवादात्मक चिंतन क्र,१ चे आयोजन केले आहे. यामध्ये इस्लामपूर येथील डॉ. श्यामसुंदर मिरजकर व घेरडी (ता.सांगोला) मधील ह. भ. प. ज्ञानेश्वर बंडगर महाराज यांचा सहभाग असणार आहे. यासाठी अध्यक्षस्थान मिरजचे राष्ट्रसेवा दलाचे जेष्ठ कार्यकर्ते सदाभाऊ मगदूम हे भूषवणार आहेत. दि.१० मे २०२५ रोजी सकाळी सात ते ८.३० पर्यंत पंढरपूर मधील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराजवळ असलेल्या श्री.संत शिरोमणी नामदेव महाराज पायरी व श्री.संत चोखामेळा समाधीस्थळ येथे भजन, प्रार्थना, व श्री संत चोखामुळे यांच्या श्री. विठ्ठल दर्शनाचा सांकेतिक सोहळा संपन्न होणार आहे. त्यानंतर सकाळी ८.३० वा. श्री. विठ्ठल मंदिर ते श्री. संत कैकाडी महाराज मठ पंढरपूर पर्यंत पदयात्रा (वाटचाल) काढण्यात काढण्यात येणार आहे. त्यानंतर स. ९.३० वा. श्री संत कैकाडी महाराज मठ, पंढरपूर मध्ये श्री. संत विचारपीठ पंढरपूर यांच्या वतीने २०२४-२५ मध्ये घेण्यात आलेल्या 'संत साहित्या'वरील निबंध स्पर्धेच्या बक्षिस वितरणाचा कार्यक्रम, तसेच 'संत साहित्य आणि सामाजिक वास्तव' या विषयावर परीसंवादात्मक चिंतन क्र.२ चे आयोजन केले असून यामध्ये सांगोल्याचे प्रसिद्ध साहित्यिक डॉ.कृष्णा इंगोले व परळीचे ह.भ.प. डॉ. श्यामसुंदर सोन्नर महाराज यांचा सहभाग असणार आहे. याचे अध्यक्षस्थान ह.भ.प.भारत जाधव महाराज पंढरपूर हे भूषवणार आहेत. दुपारी १ वा. तीर्थप्रसाद व विसर्जन होणार आहे. तरी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे संपन्न होणाऱ्या 'समता वारी संस्कार शिबिरा'स उपस्थित राहण्याचे आवाहन प.पू.साने गुरुजी स्मारक समिती, पंढरपूर व संत विचारपीठ, पंढरपूर यांच्या वतीने केले आहे. या समता वारी २०२५ च्या 'समता संस्कार शिबिरा'च्या अधिक माहितीसाठी ह. भ. प. भारत जाधव महाराज (९०११०९७९७९), दादासाहेब रोंगे (मोबा.क्र.७३५०१३३०००), ह.भ.प.अनंत तनपुरे महाराज (९९६०३६३७७७), शिवाजीराव शिंदे (९०११०९५७११), ह.भ.प.ज्ञानेश्वर बंडगर महाराज (८४५९२१२०२५), सारंग कोष्टी (९०९६९१३८४९) राजाभाऊ अवसक (९०२८२२१७१७) व निशिकांत प्रचंडराव (९९६०३०५२५२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे,

# जात पडताळणी प्रमाणपत्र काढण्यास मुदतवाढ मिळावी

## मराठा सेवा संघाच्या वतीने पालकमंत्र्याकडे केली मागणी



पंढरपूर/प्रतिनिधी

शालेय विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र काढण्यास मुदतवाढ मिळवण्यास यावी अशी मागणी एका निवेदनाद्वारे मराठा सेवा संघाचे तालुकाप्रमुख सचिन काळे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे केली आहे

मराठा सेवा संघाचे तालुकाप्रमुख सचिन काळे यांनी गोरे यांना दिलेल्या निवेदनात पुढे असे म्हटले आहे की शासकीय शाळेत विद्यार्थ्यांच्या झालेल्या ऍडमिशन साठी कुणबी प्रमाणपत्राच्या माध्यमातून ऍडमिशन झाले आहे या विद्यार्थ्यांना ७ एप्रिल २०२५ पर्यंत मुदत होती सदर जात पडताळणी ऑफिस सोलापूर येथे या कालावधीत तीन ते चार महिने अध्यक्ष नसल्याकारणाने जात पडताळणी प्रमाणपत्र लांबणीवर पडले आहे आमच्या निदर्शनाचा असे आले आहे की सोलापूर जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांना तीन ते चार महिन्याचाच कालावधी वाढवून द्यावा ही विनंती मराठा सेवा संघ करमाळा यांच्या वतीने करत आहोत तसेच महसूल प्रशासनाने महाराष्ट्रामध्ये अनेक तालुक्यांमध्ये कुणबी नोंदी सापडले आहे त्या नोंदी महसूल विभागाच्या जीर्ण अवस्थेमध्ये असल्याने महसूल पुरावा कागदपत्र तपासणीसाठी मागवतात यासाठी काही दप्तर फाटलेले असते व कागद कुजलेल्या असल्यास कारणाने ते नाव स्पष्ट दिसत नाही त्यामुळे विद्यार्थ्यांचे बरेच प्रस्ताव रिजल्ट होत आहेत मग महसूल प्रशासनाकडे त्यांच्या वेबसाईट मध्ये प्रिंट असून सुद्धा त्याला मान्यता का मिळत नाही असा प्रश्न मराठा सेवा असे निवेदनात म्हटले आहे.

सोलापूर पडताळणी ऑफिसला सुनावणीच्या वेळी येणाऱ्या विद्यार्थ्यांची हेळसांड होत असून वेळेत काम सुरू होत नाही अधिकारी सतत गैरहजर असतात या कारणाने ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालक यांना वारंवार ग्रामीण भागातून यावे लागत आहे त्यामुळे मानसिक त्रास व आर्थिक नुकसान होत आहे या कारणाने आमची विनंती आहे की जात पडताळणीचे अधिकारी मा प्रांताधिकारी व मा तहसीलदार तहसीलदार यांना देण्यात यावीत अशी मागणी सखल मराठा सेवा संघाच्या वतीने करत आहोत असे निवेदनाच्या शेवटी म्हटले आहे निवेदनात देताना यावेळी मराठा सेवा संघाचे कार्याध्यक्ष सतीश वीर तसेच सदस्य पप्पू बर्डे शरद जाधव आणि मराठा सेवा संघाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्वेरीत सिव्हील इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर सायन्स व एमसीए या विभागांचा पालक मेळावा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या, सिव्हील इंजिनिअरिंग, कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग व पदव्युत्तर पदवी असलेल्या एमसीए या तिन्ही विभागांतर्फे एकत्रितरीत्या 'पालक मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.




स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली या तीन विभागांच्या पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर पालक प्रतिनिधी म्हणून अभिजित भोसले, कै. लक्ष्मणराव इंगोले शिक्षण प्रसारक व बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भीमाशंकर इंगोले व महिला पालक प्रतिनिधी म्हणून सौ.अलका शिंदे ह्या उपस्थित होत्या. दीपप्रज्वलनानंतर सिव्हील इंजिनिअरिंग विभागातर्फे विभागप्रमुख डॉ. एस.पी. पाटील, कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातर्फे प्रा. व्ही. डी.जाधव तर एमसीए विभागातर्फे प्रा. एम.वाय शेख यांनी आपल्या विभागातील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या बाबी सविस्तरपणे सांगितल्या. यामध्ये प्रयोगशाळेत उपलब्ध यंत्र सामुग्री, अद्ययावत असलेले मशीन्स, इंडस्ट्रीयल व्हिजीटच्या माध्यमातून प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी कसे कामकाज चालते या बाबत प्रात्यक्षिक माहिती, स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांची आकडेवारी, ग्रंथालयात अभ्यास व स्पर्धा परीक्षेच्या दृष्टीने उपलब्ध असलेली पुस्तके, महाविद्यालयाला मिळालेली मानांकने आणि त्याचे विद्यार्थ्यांना भविष्यात होणारे फायदे, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व वाढीसाठी एन.एस.एस., नियमित योगा, कार्यशाळा यासारखे विविध उपक्रम, उच्चशिक्षण घेतलेल्या प्राध्यापकांची यादी, गुणवंत विद्यार्थ्यांची आकडेवारी, तसेच विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांसंदर्भात विकासात्मक धोरण, नियोजनात्मक मार्गदर्शन, 'गेट' परीक्षेची तयारी, नियमित घेतल्या जाणाऱ्या टेस्ट आणि त्यांचे विश्लेषण यामधून विद्यार्थ्यांना मिळणारी तंत्रशिक्षणातील अद्ययावत माहिती, या व अशा विविध उपक्रमांची माहिती तिन्ही विभागांकडून देण्यात आली. पालक मेळाव्यात पालकांनी पाल्याच्या यशात आपली नेमकी काय भूमिका असावी याबाबत माहिती जाणून घेतली. यावेळी 'गेट' या अवघड परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रा. पूजा रोंगे यांच्यासह तिन्ही विभागांतील प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. प्लेसमेंट विभागाचे प्रा.एस.एम.खोमणे यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्वाच्या असणाऱ्या 'गेट परीक्षा, स्वेरीमध्ये येणाऱ्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कंपन्या, प्लेसमेंट विभागामार्फत चालणारे कार्य, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढीसाठी व करिअर करण्यासाठी आवश्यक बाबी, इंग्रजी भाषा कौशल्ये, आत्मविश्वास वाढविण्यासाठी व संभाषण कौशल्य सुधारण्यासाठी विविध स्पर्धात्मक प्रयोग, सादरीकरण, प्रकल्प, तांत्रिक प्रशिक्षण, इंटर्नशीप, स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी? हे करताना पालकांनी कोणती भूमिका घ्यावी ? आदी करिअरच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची माहिती पालकांना दिली. यावेळी स्वेरीच्या नियोजनावर आणि यातून झालेल्या पाल्यांच्या प्रगतीबाबत पालकवर्ग समाधानी असल्याचे जाणवले. कांही पालकांनी किरकोळ सूचना केल्या असता संबंधित सूचना व प्रश्न वरिष्ठ पातळीवर सोडविण्याचे आश्वासन विभागप्रमुखांनी दिले. या पालक मेळाव्यात प्रा. पूजा रोंगे, प्राध्यापक वर्ग, तिन्ही विभागातील विद्यार्थ्यांचे साधारण २५० पालक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. एस. ए. शेगदार व प्रा. पी.व्ही.केळकर यांनी पालक मेळाव्याचे सूत्रसंचालन केले तर वसतिगृह व्यवस्थापक डॉ. करण पाटील यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# लिंगायत समाज टाकळी रोड पंढरपूरच्या वतीने जगत ज्योती महात्मा बसवेश्वर छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

लिंगायत समाज टाकळी रोड पंढरपूर यांच्या वतीने श्री गणपती मंदिर गणेश नगर पंढरपूर येथे जगत ज्योती महात्मा बसवेश्वर व छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहाने पार पाडण्यात आले




प्रथमता महात्मा बसवेश्वर व छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन पंढरपूरचे युवा नेते श्री प्रणव परिचारक लक्ष्मी टाकळी गावचे सरपंच श्री संजय साठे नगरसेवक श्री निर्णय डोंबे श्री नगरसेवक निलेश भामरे माजी नगरसेवक सचिन कुलकर्णी माजी नगरसेवक आदित्य फत्तेपुर व नगरसेवक श्रीनिवास बोरगावकर जिल्हाध्यक्ष वीरशैव आघाडी अँड राजेश भादुले व श्री अमित डोंबे श्याम भोगाव सर भोसरी सिद्धेश्वर कोरे सर यांच्या हस्ते मूर्तिपूजन करण्यात आले यानंतर प्रस्तावनामध्ये श्री रामेश्वर कोरे जगत ज्योती श्री बसवेश्वर व श्री छत्रपती महाराज जयंती ही तिथे अनुसार ही अक्षय तृतीया मुहूर्तावर लिंगायत समाज टाकळी रोड पंढरपूर येथे गेली दोन वर्षापासून साजरी करत असलेल्या उपक्रमाबद्दल माहिती दिली व तसेच महात्मा बसवेश्वर यांची विचार १२ व्या शतकातील आध्यात्मिक ऐतिहासिक सामाजिक परिवर्तन घडवून आणणारे एक महान युगपुरुष असे महान बसवेश्वर संबोधले जातात व खऱ्या अर्थाने बारावी शतकात क्रांती करणारी अनिष्ट प्रथा रूढी परंपरा वाद जातीयता अंधश्रद्धा कर्मकाळ यांना विरोध करून सामाजिक व्यवस्था उभी करण्याचे कार्य महात्मा बसवेश्वर यांनी केले असे विचार महात्मा आपले बेकातून श्री रामेश्वर कोरे यांनी सांगितले व त्यांच्यानंतर प्रसाद वाटप कार्यक्रम लिंगायत समाज टाकळी रोड पंढरपूर यांच्या वतीने करण्यात आले महात्मा बसवेश्वर व शिवछत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यासाठी सिद्धेश्वर पुरे श्री नागेश कुंभार हे धनंजय मामाने श्री राहुल मामाने श्री डॉक्टर मिलिंद नकाते प्रशांत शेटे श्री प्रशांत भागवत श्री नागेश गुळवे श्री चंद्रकांत बेर्गीकर शैल कारभारी श्री योगेश आंधळगावकर सिद्धेश्वर बिराजदार अशोकराव मरले सुभाष शास्त्री भीमाशंकर सावरगाव संजय पाटील अण्णा रायपुरे आधी बहुसंख्य लिंगायत समाज बुद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**संग्रहालयाचे काम अंतिम टप्प्यात**

**प्रधानमंत्री यांच्या हस्ते होईल उद्घाटन**

# छत्रपती शिवाजी महाराजांचा दैदिप्यमान इतिहास डोळे दिपवणाऱ्या संग्रहालयाच्या माध्यमातून जनतेसमोर येणार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : छत्रपती शिवाजी महाराज मेमोरियल राष्ट्रीय समितीच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा दैदिप्यमान इतिहास डोळे दिपवणाऱ्या संग्रहालयाच्या माध्यमातून जनतेसमोर उभा करण्यात येत आहे. या संग्रहालयाचे काम अंतिम टप्प्यात असून या संग्रहालयाचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होईल, अशी माहिती समितीचे महासचिव कर्नल मोहन काक्तीकर (सेवानिवृत्त), मिलिंद पाटील यांनी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी गार्डियन मीडिया आणि इंटरटेनमेंट चे संचालक संजय दाबके हे ही उपस्थित होते. श्री दाबके यांच्या माध्यमातून अत्याधुनिक अद्यावत असे संग्रहालय मूर्त रूपात उभे राहत आहे.



छत्रपती शिवाजी महाराज मेमोरियल राष्ट्रीय समिती ही दिल्लीतील इन्स्टिट्यूशनल एरिया कुतुब एन्क्लेव्ह या ठिकाणी आहे. या इमारतीचे उद्घाटन तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते झाले होते. या ठिकाणी जागतिक दर्जाचे छत्रपती शिवाजी महाराजांचे ऐतिहासिक संग्रहालय राजधानी दिल्लीत असावे असा मानस समितीचा होता. त्याप्रमाणे वर्ष २०२० पासून यावर काम सुरू आहे. अशी माहिती, श्री काक्तीकर यांनी यावेळी दिली.

उत्तर भारतामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दलची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचवावी यासाठी अ त या ध ु नि क तंत्रज्ञानाच्या साहाय्याने संग्रहालय उभारण्यात येत असल्याची माहिती श्री काक्तीकर यांनी यावेळी दिली.

हे संग्रहालय छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने तयार करण्यात आलेले आहे. पाच मजली इमारतीच्या तळ मजल्यात हे संग्रहालय असणार आहे.

या संग्रहालयातील वस्तू या ऐतिहासिक दस्ताऐवजांच्या सहाय्याने तयार करण्यात आलेल्या आहेत. संग्राहालय पाहताना महाराजाच्या काळात आपण आहोत असा आभास निर्माण करण्यात आलेला आहे. संग्रहालयातील काही भागांमध्ये १३ डी या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आहे.

यासह डार्क राईडच्या माध्यमातून शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटनांना पाहता येईल. हे देशातील एक अभूतपूर्व असे संग्रहालय असणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...




### बनावट आधार कार्डद्वारे फसवणूक; तिघांवर पुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) बनावट आधार कार्ड तयार करून प्लॉट चालू बाजारभावाने विकून खरेदी बनावत दस्त तयार करत फसवणूक केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी जी.बी कोरत (वय-५४-,रा.ई पालक्मॅल्ली हाऊस वाईफ मेडोस उदयनगर,वेंगोला,तालुका कुन्नाडुनाल, जिल्हा एर्नाकुलम,केरळ) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सुनील वामनराव नान्नजकर (रा.लक्ष्मी पेठ,दमानी नगर), बसवराज चंद्रकांत बिराजदार (रा.पश्चिम मंगळवार पेठ) बसवराज सिद्धराम पुजारी या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. हि घटना १३ मार्च २०१८ रोजी ते २७ जुलै २०२१ दरम्यान महात्मा गांधी नगरी पतसंस्था येथे घडली.

याबाबत अधिक माहिती अशी की, वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांच्या वडिल मयत माहिती असताना देखील त्यांनी बसवराज बिराजदार व बसवराज पुजारी यांनी व एक अनोळखी तोतया इसम यांच्याशी संगणमत करून फिर्यादी यांच्या वडिलांच्या नावे बनावट आधार कार्ड करून तोतया इसम उभा करून वडिलांच्या नावे असलेले प्लॉट नंबर १४८ व १४९ चालू बाजारभाव प्रमाणे अंदाजे ३० लाख रुपये ची बनावट खरेदी दस्त फिर्यादी यांच्या परस्पर करून घेऊन फसवणूक केली.तसेच खरेदी खताच्या आधारे महात्मा नागरी पतसंस्था मर्या सोलापूर यांच्याकडे जागा गहाण ठेवून पाच लाख रुपये कर्ज घेतल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक ढवळे हे करीत आहेत.

# अवैध वाळू वाहतूकीवर महसूल प्रशासनाची कारवाई : तहसिलदार सचिन लंगुटे

## दोन वाहने केली जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : अवैध वाळू उपसा व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. महसूल प्रशासनाच्या पथकाने भीमा नदीपात्रात अवैध वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणारे अशोक लेलँडचा एक पिकअप व टाटा कंपनीचा एक पिकअप अशी दोन वाहने जप्त करण्यात आल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी विविध पथकांची नेमणूक केली आहे. दिनांक ०५ मे रोजी पहाटे गोपाळपूर भीमा नदी पात्रामध्ये अवैध वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या टाटा कंपनीचे विना





नंबरचा एक पिकअप व दिनांक ०७ मे रोजी दुपारी गोपाळपूर- मुढेवाडी रस्त्यावर वाहतुक करताना अशोक लेलंड कंपनीचा पिकअप वाहन क्रमांक एम एच-१२-जीटी-८७१५ अशी दोन वाहने पकडण्यात आली असून, सदर वाहने शासकीय धान्य गोदाम पंढरपूर येथे लावण्यात आली आहेत.

या कारवाईमध्ये मंडळ अधिकारी कासेगांव पंकज राठोड, ग्राम महसूल अधिकारी साईनाथ अडगटाळे सहभागी होते.

## चिकलठाण येथील रेवन नाथ मोरे यांना प्रगतशील पुरस्कार प्रदान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : तालुका करमाळा चिकलठाण येथील रेवननाथ मोरे यांना पाठवता जिल्हा अहिराणी नगर येथील भक्ती शक्ती प्रतिष्ठानच्या प्रगतशील शेतकरी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पाटोदा तालुका जामखेड जिल्हा बीड येथील भक्ती शक्ती प्रदेशांच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरवण्यात येते यामध्ये यावर्षीचा वारकरी भूषण सेवार्थ पुरस्कार आदर्श शेतकरी पुरस्कार शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजीराव भिडे यांच्या हस्ते महाराष्ट्र मंदिर महासंघाचे डॉक्टर दत्तात्रय चौरंगी महाराज प्रसिद्ध कीर्तनकार विठ्ठल पाटील महाराज यांच्या उपस्थितीत प्रधान करण्यात आला करमाळा तालुक्यातील चिकलठाण नंबर दोन येथील रेवननाथ मोरे यांनी आपल्या शेतीमध्ये विविध पिकांमध्ये घेतलेले भरगोस उत्पादन व शेतीमध्ये केलेली वेगवेगळे प्रयोग यांची दखल घेऊन त्यांना प्रगतशील शेतकरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे या कार्यक्रमाला पुणे येथील सर्वेश प्रतिष्ठानचे ज्ञानेश ताटे डॉक्टर प्रवीण कासार भारत चव्हाण आंबादास भोगाडे रवींद्र खोत कलाप्पा कुंटे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होते व त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल करमाळा तालुक्यातील विविध क्षेत्रातील शेतकऱ्यांकडून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

## प्रदेशिक व्यवस्थापक श्रीकांत गबणे यांची नळदुर्ग बसस्थाकाला भेट

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्गच्या ऐतिहासिक नगरीत ड ढ महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक श्रीकांत गबणे यांनी नळदुर्ग येथील बसस्थानकाला अचानक भेट देऊन पाहणी केली असता बसस्थानकातील स्वच्छता आणि टापटीप बघुन त्यांनी आपल्या बसस्थानकाचे कौतुक करत नळदुर्ग येथील वाहातुक नियंत्रक महेश डुकरे यांचे त्यांच्या पाठीवर हात फिरवत



**वाहातुक नियत्रंक महेश डुकरे यांचे केले तोंडभरून कौतुक**



कौतुक केले . प्रादेशिक लेखाधिकारी किशोर अदमाने कामगार अधिकारी सुतार , विभागीय वाहतूक अधीक्षक कोष्टी आगार व्यवस्थापक तुळजापूर शिंदे वाहातूक नियंत्रक महेश डुकरे प्रवाशी सदस्य प्रशांत मिटकर पत्रकार तथा संपादक दादासाहेब बनसोडे रिपाई चे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे शहर कार्याध्यक्ष महादेव कांबळे उपस्थित होते. यावेळी वाहातुक नियंत्रक महेश डुकर प्रवाशी सदस्य प्रशांत मिटकर व पत्रकार दादासाहेब बनसोडे यांनी आलेल्या वरिष्ठांचा बुके देऊन सत्कार करण्यात आला. नळदुर्ग बसस्थानक व परिसरातील प्रेक्षणीय भाग झाडी प्रवाशांच्या सोयीसाठी विश्रांतीसाठी सिमेंट बाकडा बोअर पाणी व्यवस्था कॅन्टीन बाहेरची वाहतुक बंद आदि कामावर व स्वच्छता बघुन खुप खूष होऊन आनंद व्यक्त केला

## स्थानिक ग्रामस्थांच्या भावना व कायदेशीर अडचणी पाहून विमानतळ प्रकल्प रद्द करा - अंबादास दानवे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुरंदर:प्रतिनिधी : पुरंदर - पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील आंतरराष्ट्रीय विमानतळास बाधित सात गावच्या ग्रामस्थांचा प्रचंड विरोध आहे, कोणत्याही परिस्थितीत विमानतळ प्रकल्पास जागा दिली जाणार नाही अशी येथील शेतकऱ्यांची भावना आहे, त्यामुळे स्थानिक ग्रामस्थांच्या भावना व कायदेशीर अडचणी पाहून शासनाने पुरंदर तालुक्यातील विमानतळ प्रकल्प रद्द करावा व बारामती येथील विमानतळाचा विस्तार करण्या बाबतचे संबंधितांना निर्देश द्यावेत अशी मागणी राज्याचे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लेखी पत्र देऊन केली आहे.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी चार दिवसा पुर्वी पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प बाधित क्षेत्रातील ग्रामस्थांची भेट घेऊन वास्तव जाणून घेतल्यानंतर त्यांनी थेट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लेखी पत्र देऊन वरील मागणी केली आहे, मुख्यमंत्री यांना दिलेल्या लेखी पत्रात अंबादास दानवे यांनी म्हटले आहे की, संभावे विमानतळा पासून पुणे येथील विमानतळ केवळ ३६ कि.मी. अंतरावर आहे, असे असताना दुसरे विमानतळ उभारण्याची आवश्यकता नाही, बाधीत क्षेत्रातील शेत जमीन ही ९९ . ६९ टक्के जमीन ही जिरायत व बागायत आहे ,केवळ ० . ३९ टक्के जमीन ही बिगरशेती स्वरुपाची आहे, प्रकल्पास अपेक्षित क्षेत्रापैकी ९७. ११ टक्के जमीन ही खाजगी स्वरुपाची असुन २. ८९ टक्के जमीन ही शासकीय आहे, भूसंपादन उचित मोबदला व पूनर्वसन पूनर्स्थापन याबाबतचा हक्क अधिनियम २०१३ च्या कलम १० मध्ये स्पष्ट नमुद केले आहे की, अत्यंत सुपीक जमीन किंवा बागायती क्षेत्र, अनिवार्य कारणास्तव व पर्यायी जमीन अनुपलब्ध असल्याशिवाय संपाधित करु नये, सदर प्रकल्पासाठी निवडण्यात आलेल्या भूखंडामध्ये सुपिकता व कृषीक्षमता उच्च स्तरावरील असल्याने प्रस्तावित जमीन संपादन करणे हे कायद्याच्या मुळ उद्देशाचे उल्लंघन करणारी आहे. तसेच जमीन संपादन पुनर्वसन आणि पुनर्वसन अधिनियमन २०१३ च्या तरतुदीनुसार खाजगी प्रकल्प अथवा सार्वजनिक खासगी भागीदारी प्रकल्पासाठी अनुक्रमे ८० ते ७० टक्के भूधारकांची लेखी संमती असल्याशिवाय भूसंपादन करता येत नाही, प्रस्तावित प्रकल्प क्षेत्रात पर्यावरणीय व सामाजिक परिणाम मुल्यांकन अहवालाच्या पारदर्शकते बाबतही साशंकता आहे. भू -विकास व नागरी नियोजन संदर्भातील धोरणा नुसार देखील कृषी क्षेत्राचा अत्यल्प किंवा विनाश सुनिश्चित करणे आवश्यक आहे, तथापि, या सर्व बाबींकडे शासनाने दुर्लक्ष केल्याने, विमानतळ बाधित गावातील शेतकऱ्यांनी या प्रकल्पास विरोध केलेला आहे, त्यामुळे सदर विमानतळ प्रकल्प रद्द करण्यात यावा व बारामती विमानतळाचे विस्तारीकरण करण्याबाबत संबंधित यंत्रणेला निर्देश देण्यात यावेत अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राज्याचे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी लेखी पत्राद्वारे केली आहे, व त्याच्या प्रति राज्याचे मुख्य सचिव व पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांना दिल्या आहेत,

## बंद पडलेल्या एसटीला बल्करची धडक

सोलापूर (प्रतिनिधी) एसटी बस क्रं.एम एच.०६.८९१९ चे जॉईंट रॉड तुटून प्रेशर पाईप फुटल्याने गाडी बंद पडली. त्यानंतर ही गाडी पन्नास फूट अंतरावर दगड व झाडाच्या फांद्या लावून उभी असताना बल्कर क्रमांक एम.एच.१२.यु एम.४०३९ ही भरधाव वेगात चालकाने चालवून एसटी बसला मागून धडक देऊन मागील दोन काचा व बॅटरी खाली पडून बाकडे तुटून ८० हजार रुपयाचे नुकसान केल्याची फिर्याद सहदेव लक्ष्मण मायमारे (वय-४२-,रा. मुक्काम पोस्ट सिंगर ता.दिग्रस,जिल्हा यवतमाळ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून कैलास प्रसाद मेहता (रा.मुक्काम पोस्ट रत्नापूर,जिल्हा हजारीबाद, राज्य झारखंड) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.तसेच या घटनेत बल्करचे नुकसान होऊन स्वतः गंभीर जखमी होण्यास कारणीभूत झाला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल घुगे हे करीत आहेत. हि घटना ६ मे रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास शेगाव हायवे येथे घडली.

## कल्याणशेट्टी कनिष्ठ महाविद्यालयात यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या १२ वी बोर्ड परीक्षेत सौ. सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयाचा ८४.५४ % इतका लागला आहे. त्यात विज्ञान शाखेत एकूण ९० पैकी ८७ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ९६.६६ % निकाल लागल असून त्यात प्रथम कु.मनिषा सीताराम कदम ६९.१७ %, द्वितीय कु श्रेया अभिजीत मोरे ६७.८३ % तर तृतीय कु राजनंदिनी सिध्देश्वर स्वामी ६७.५० % घेऊन बाजी मारले आहेत.

कला शाखेत एकूण ४६ पैकी २९ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ६३.०४ % निकाल लागला आहे. त्यात प्रथम कु शुभांगी विजयकुमार कोरे ८७.८३ %, कु वैभवी शिवाजी धर्मसाले ८२.३३% तर तृतीय कु संजीवनी महेश सुतार ७५% गुण मिळवून यशस्वी झाले आहेत.

तर वाणिज्य शाखेत एकूण ७१ पैकी ५९ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ८३.०९ % निकाल लागला असून प्रथम कु भूमिका प्रशांत पाटील ७९.३३% द्वितीय शरणप्पा लक्ष्मण वाले ७७.६७% तर तृतीय सुजाता अप्पाराव पाटील ७३.३३ % गुण मिळवून यश संपादन करून याहीवर्षी गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार सचिन कल्याणशेट्टी यानी कौतुक करून अभिनंदन केले आहे.

निकालानंतर यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक सर्व शिक्षकांचे संचालक मल्लीनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पेढा भरवून सत्कार करण्यात आला. यावेळी संचालक मल्लिकार्जुन मसुती, कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, संचालक मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी हे उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रा गुरूसिध्द हपाळे यानी केले तर उपस्थितांचे प्रा. शितल टिंगरे यानी आभार मानले.

**देशाचे खंबीर नेतृत्व प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचे अभिनंदन — केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले**

# ‘ऑपरेशन सिंदूर’द्वारे भारतीय सैन्याने केलेली अतुलनीय कामगिरी अभिमानास्पद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हो ची मिन्ह व्हिएतनाम/मुंबई

ऑपरेशन सिंदूर द्वारे भारतीय सैन्याने दहशतवाद्यांची तळे नेमकी हेरून उध्वस्त केली.दहशतवाद नेस्तनाबूत करण्यासाठी सिन्दुर ऑपरेशन महत्वाचे ठरले आहे.या अतुलनीय कामगिरी बद्दल भारतीय सैन्याचा आम्हाला कायम अभिमान असून ऑपरेशन सिंदूर द्वारे सैन्याने केलेली अतुलनीय कामगिरी अभिमानास्पद आहे. दहशतवाद कायमचा गाडण्यासाठी ऑपरेशन सिन्दुर सारखी कारवाई पुन्हा पुन्हा करून पाकव्याप्त काश्मीर भारताने ताब्यात घेतला पाहिजे.भारताचे खंबीर नेतृत्व प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पाकव्याप्त काश्मीर एकदिवस नक्की भारताचा ताब्यात घेतील याबद्दल आम्हाला विश्वास आहे. सिन्दुर सारखे ऑपरेशन घडवून पाकला धडा शिकविल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करीत आहोत.अशी प्रतिक्रिया रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी आज दिली.

पहलगाम येथे पाकपुरस्कृत दहशतवाद्यांच्या भ्याड हल्ल्यात निष्पाप निर्दोष २८ भारतीय पर्यटकांचे हत्याकांड घडविण्यात आले.त्याचा बदला आज भारताने सिन्दुर ऑपरेशन द्वारे घेतला आहे. मधील दहशतवाद्यांच्या हल्ल्यात बळी गेलेल्या भारतीय पर्यटकांना खरी श्रद्धांजली आज भारतीय सैन्याने आणि प्रधानमंत्री मोदींनी ऑपरेशन सिन्दुर द्वारे वाहिली आहे असे ना.रामदास आठवले यांनी म्हंटले आहे.



रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले आज बुद्ध पौर्णिमा महोत्सव निमित्त व्हिएतनाम येथील हो ची मिन्ह या शहरात आयोजित आंतरराष्ट्रीय बौद्ध धम्म परिषदेत प्रमुख अतिथी म्हणून सहभागी झाले असून व्हिएतनाम मधून ना.रामदास आठवले यांनी भारतीय सैन्याने केलेल्या सिन्दुर ऑपरेशन बद्दल भारतीय सैन्य दल आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करणारा संदेश पाठवला आहे.

ऑपरेशन सिंदूर बद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी , संरक्षणमंत्री राजनाथ सिंह , गृहमंत्री अमित शहा यांचे आणि भारतीय सैन्यदलाचे अभिनंदन! आतंकवादाचा नायनाट करून प्रधानमंत्री मोदी पाकव्याप्त काश्मीर भारताच्या ताब्यात घेतील असा आम्हाला विश्वास आहे. आता पकड्याना चांगलाच धडा शिकवला असून पुन्हा भारताकडे वाकड्या नजरेने बघण्याची पाकची हिम्मत होणार नाही असे केंद्रीय राज्य मंत्री ना. रामदास आठवले यांनी आपल्या संदेशात म्हंटले आहे.

## थोडक्यात...




### राँग साईडने वाहन चालवून धडक; एकजण गंभीर जखमी

सोलापूर, (प्रतिनिधी) : राँग साईडने वाहन चालवून एकास धडक दिल्याप्रकरणी एका वाहन चालकाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २ मे रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास तुळजापूर रोड येथे घडली.

याप्रकरणी दत्तात्रय गोरख वाडकर (वय-३५,रा.कासेगाव) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांचा भाऊ गणेश वाडकर (वय-३१) हा दुचाकी क्रमांक १३.सी. व्ही.९६९६ वरून सोलापूर ते राहत्या घराकडे जात असताना वरील ठिकाणी आला असता अज्ञात दुचाकी चालकाने त्याच्या ताब्यातील एमएच.१३.ईई.१८०१ ही भरधाव वेगाने राँग साईडने चालवून फिर्यादी यांच्या भावास धडक देऊन गंभीर जखमी होण्यास कारणीभूत झाला आहे असे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल साळुंखे हे करीत आहे.

### महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावले; दोन अनोळखी इसमानवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) आई व मुलगी दुचाकीवरून जात असताना अज्ञान दोन इसमांनी मोटरसायकलवर येऊन मागे बसलेल्या एकाने फिर्यादी रूपाली संतोष अहिरसंघ (वय-४१, रा.डांगे नगर, बाळे) यांच्या गळ्यातील चाळीस हजार रुपये किमतीचे सोन्याचे आणि मंगळसूत्र जबरीने हिसकावून घेऊन चोरी केली असल्याची फिर्याद फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली आहे.

त्यांच्या फिर्यादीवरून दोन अनोळखी मानविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना ६ मे रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास सोलापूर पुणे हायवे वरील मडकी वस्ती लोखंडी चार लोखंडी पादचारी पुलाच्या पुढे सोलापूर ट्रान्सपोर्ट येथे घडली.या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक धायगुडे हे करीत आहेत.

### हँडल लॉक केलेली दुचाकी पळवली

सोलापूर (प्रतिनिधी) हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१३.बीएक्स.५९०५ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ३ मे रोजी रात्री साडेनऊ ते साडेदहा वाजण्याच्या सुमारास विश्व हॉटेल येथे घडली.

याप्रकरणी प्रवीण मनोहर बुरंगले (वय-२१,रा.कुंभार गल्ली) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पापडे हे करीत आहेत.

# जिल्ह्यातील अवैध धंद्यावर तात्काळ कारवाई करावी : गृहराज्य मंत्री योगेश कदम

## पोलीस आयुक्त कार्यालयात गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, दिनांक ७ (जिमाका):- सोलापूर शहर व जिल्हयात मटका, डान्सबार, अवैध मद्य विक्री सह अन्य अवैध व अनाधिकृत व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी आहेत. पोलीस प्रशासनाने अशा अवैध व अनाधिकृत व्यवसाय करणाऱ्या संबंधिताची माहिती घेऊन त्यांच्यावर तात्काळ कारवाई करुन ते धंदे बंद करावेत, अशा सूचना राज्यमंत्री गृह(शहरे) महसूल, ग्रामविकास व पंचायत राज, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण अन्न व औषध प्रशासन मंत्री योगेश कदम यांनी दिल्या.



पोलीस आयुक्त कार्यालय, सोलापूर येथे गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी पोलीस आयुक्त.एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त श्रीमती दिपाली काळे, अजित बोऱ्हाडे, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्न धान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे व संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी गृहराज्य मंत्री योगेश कदम म्हणाले, महाराष्ट्रात सायबर क्राईमच्या गुन्हयांच्या तक्रारीमध्ये वाढ होत आहे. सायबर गुन्ह्यांची वाढ लक्षात घेता नागरिकांना तात्काळ प्रतिसाद देवून त्यावर उपाययोजना कराव्यात. तसेच जिल्हयात अनाधिकृपणे गुटखा विक्री होणार नाही दक्षता घेवून गुटखा विक्रीवर आळा घालण्यासाठी अन्न व औषध विभाग व पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे कार्यवाही करावी अशा सूचानाही त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी पोलीस आयुक्त एम.राजकुमार म्हणाले, सोलापूर शहरात एकूण सात पोलीस स्टेशन आहेत. तसेच वर्षात १७० मिरवणूक असतात. त्यासुरळीत पारपाडण्यासाठी पोलीस प्रशासन सतत प्रयत्नशील आहे. १०० दिवसीय कृती आराखडया अभियानातंर्गत या विभागामार्फत ११०० वाहनांचा लिलाव करण्यात आला आहे. तसेच पोलीस प्रशासनातील रिक्त पदे तातडीने भरणेबाबत मागणी त्यांनी यावेळी केली.

# आदर्श आपले सरकार सेवा केंद्राचे उपविभागीय अधिकारी संजय पाटील यांचे हस्ते उद्घाटन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतीनीधी/सुधाकर रणदिवे : कळंब शहरातील आपले सरकार सेवा केंद्राचे संजय पाटील उपविभागीय अधिकारी व तहसिलदार हेमंत ढोकले व शहरातील नागरीक उपस्थित होते. मागील १५ वर्षांपासुन कार्यरत असलेले आपले सरकार सेवा केंद्र महाराष्ट्र शासनाच्या वेगवेगळ्या योजनेचा लाभ जनते पर्यंत आपले सरकार सेवा केंद्रा मार्फत देत आहे. शासनाच्या विविध ऑनलाईन योजना आपले सरकार मार्फत दिल्या जातात. सदर योजना देवून उत्कृष्ट काम करीत असल्यामुळे कळंब तालुक्यातुन प्रथम आपले सरकार सेवा केंद्र म्हणून निवड करण्यात आली आहे या वेळी आपले सरकार सेवा केंद्राचे संचालक .डी. एस. वाघ नायब तहसिलदार सांगळे, मंडळ अधिकारी पाचभाई, तहसिल कार्यालयाचे लिपीक गपाट व आपले सेवा केंद्राचे कर्मचारी सार्थक वाघ, हार्दिक कुचेकर, आशिष चाळक, सुरज वाघ व शहरातील नागरिकासह ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# कुरुंद येथे आगीत तीन कंटेनर ट्रक जळून खाक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : मुंबई नाशिक महामार्ग लगत भिवंडी तालुक्यातील कुरुंद गावाच्या हद्दीतील के स्केवर गोदाम संकुला लगत आर.एन.ट्रान्सपोर्ट कंपनीच्या पार्किंग मध्ये उभ्या असलेल्या तीन कंटेनर ट्रकला आग लागून तीन कंटेनर ट्रक आगीत जळून खाक झाल्याची घटना घडली आहे. आग लागण्याचे निश्चित कारण समजू शकले नाही. मागील पंधरा ते वीस दिवसापासून कंटेनर ट्रक पार्किंग मध्येच उभे होते. घटनास्थळी अग्निशमन दलाची गाडी दाखल होऊन पार्किंग मध्ये उभ्या असणाऱ्या इतर १५ गाड्या वाचवण्यात यश आले आहे. सुदैवाने कोणतीही जीवात हानी घडली नाही.



# अक्षय मगदूम यांचा विवाह सोहळा थाटात, राहुलदादा घाटगे यांच्याकडून लग्नाच्या शुभेच्छा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : राजापूर तालुका शिरोळ येथील अक्षय मगदूम यांचा विवाह सोहळा मोठ्या थाटामटात संपन्न झाला. पाहुणे, मित्रमंडळी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री गुरुदत्त शुगर्स लि.टाकळीवाडी एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर राहुलदादा घाटगे यांनी लग्नाच्या शुभेच्छा दिल्या.

या लग्न सोहळ्याला सोमनाथ कुंभार, आनंद उन्हाळे, रवी कुंभार, प्रवीण पाटील, रामचंद्र नंदीकुरळे, विजय डकरे, अमोल पाटील, विजय पाटील, विशाल बागे, श्री गुरुदत्त शुगर्स परिवार, अधिकारी, कर्मचारी, उपस्थितीत होते.

# बोपगाव येथे कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगाम पूर्व नियोजन मार्गदर्शनपर बैठकीचे नियोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ विनायक गायकवाड : मौजे बोपगाव तालुका पुरंदर जिल्हा पुणे येथे कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगाम पूर्व तयारीच्या अनुषंगाने नवीन फळबाग लागवड योजना, यांत्रिकीकरण योजना, शेडनेट, पॉलिहाऊस,शेततळे, पीएम किसान, ऍग्री स्टॅक,व सर्वात महत्त्वाचे अंजीर फळबाग क्षेत्र विस्तार संदर्भात नवीन फळबाग लागवडीचे नियोजन साठी श्री सुरज जाधव साहेब (पुरंदर तालुका कृषी अधिकारी) यांच्या मार्गदर्शनाखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. फळबाग लागवड यशस्वी होण्यासाठी लागवडीची पूर्वतयारी, आणि नियोजन,या बाबी महत्त्वाच्या आहेत जमिनीची निवड, हवामानानुसार फळ झाडांची निवड,पाण्याची उपलब्धता,योग्य




आखणी,आणि कलमांची निवड, या महत्त्वाच्या बाबी विचारात घ्याव्यात असे मार्गदर्शन श्री सुरज जाधव साहेब यांनी केले.

१)जमिनीनुसार फळपिकांची निवड २)माती व पाणी परीक्षण ३) पाण्याची उपलब्धता ४)फळबागेची आखणी आणि अंतर ५) लागवाडीसाठी खड्डे ६) फळबागसाठी खड्डा कसा कराल?

अशा प्रकारचे मार्गदर्शन श्री दिलीप जाधव (अंजीर बागायतदार व सचिव= महाराष्ट्र राज्य अंजीर उत्पादक संघ) यांनी केले.

श्री रामदास पापळ ( प्रगतशील शेतकरी मांढर) यांनी पाणी फाउंडेशन व महिला शेतकरी भगिनींना बचत गटाविषयी सखोल अशे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी श्री रवींद्र खेसे (मंडल कृषी अधिकारी सासवड )तसेच श्री गणेश जगताप (कृषी पर्यवेक्षक सासवड) व श्री संदीप भाऊ फडतरे (सभापती नीरा कृषी उत्पन्न बाजार समिती )यांनी उपस्थित शेतकरी बंधू-भगिनींना मार्गदर्शन केले. कुंडलिक फडतरे, सर्जेराव जगदाळे, पोपट तात्या फडतरे, शामराव फडतरे, संजू दादा फडतरे, राजू आनंदराव फडतरे, सोनबा सर फडतरे, बापू फडतरे, नितीन फडतरे, जिगर फडतरे, विनायक गायकवाड (पोलीस पाटील) यांसह अनेक शेतकरी बंधू भगिनी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन विजय जाधव कृषी सहाय्यक यांनी केले होते.

**जनजागर यात्रेला अनिताताई खरात यांच्या माध्यमातून सुरुवात**

**अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्म वर्षानिमित्त कार्यक्रम**

# इंदापुरमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे : ९ मे २०२३ रोजी महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभागातर्फे जीआर काढण्यात आला की प्रत्येक ग्रामपंचायतने ३१ मे रोजी ग्रामपंचायत गट ग्रामपंचायत क्षेत्रातील दोन कर्तबगार महिलांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्कार देऊन सन्मान करण्यात यावा. त्याप्रमाणे ३१ मे २०२३ रोजी सर्व ग्राम पंचायत ने हा पुरस्कार महिलांना प्रदान केला ही परंतु लगेच दुसऱ्या वर्षापासून ग्रामपंचायतींना याचा विसर पडला ज्या अहिल्यादेवी होळकरांनी आपले पूर्ण आयुष्य समाजासाठी गोरगरिबांसाठी महिलांसाठी देश हितासाठी दिले त्यांनी कधीही जात-पात धर्म पाहिला नाही त्यांच्या कार्याचा गौरव करणारा पुरस्कार फक्त एक वर्ष देऊन थांबवणे हे







कुठेतरी मूर्खपणाचे लक्षण आहे म्हणूनच तेजपृथ्वी ग्रुपच्या संस्थापक अध्यक्षा सामाजिक कार्यकर्त्या सौ अनिताताई खरात यांनी इंदापूर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींना या पुरस्काराचे वितरण करण्यासाठी व त्यांना स्मरण करून देण्यासाठी अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्म वर्षानिमित्त प्रत्येक ग्रामपंचायत च्या ठिकाणी जाऊन सरपंच ग्रामसेवक ग्रामपंचायत सदस्य जे कोणी उपस्थित असतील त्यांना व गावातील काही प्रतिष्ठित नागरिकांना असे लेखी पत्र देण्याचे ठरवले व त्यांनी त्याची सुरुवात आज चाकाटी या गावापासून केली आहे, चाकाटी ग्रामस्थांकडून अनिता ताईंचे अतिशय उत्साहात स्वागत करण्यात आले व आम्ही या पुरस्काराचे नक्कीच वितरण करू असा शब्दही देण्यात आला. तालुक्यातील कोणत्याही ग्रामपंचायत ने असा पुरस्कार ३१मे २०२५ रोजी दिला नाही तर अनिता खरात ३१ मे नंतर इंदापूर पंचायत समिती येथे गटशिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयाबाहेर अनिता खरात पुरस्कार न देणाऱ्या ग्रामपंचायतचा निषेध म्हणून त्या ग्राम पंचायतचे नाव बोर्ड वरती लिहून एक दिवसीय लाक्षणीक उपोषण करणार आहेत व त्या ग्रामपंचायतीची तक्रार गटविकास अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्याकडे करणार आहेत, आणि आपल्या तालुक्यातील कोणत्याही ग्राम पंचायतचे नाव बोर्डवर टाकून त्यांचा निषेध करण्याची वेळ आपल्यावर येऊ नये म्हणून त्यांनी अगोदरच असा कडक उन्हाचा पारा असतानाही तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत स्थळी जाऊन तसे पत्र देण्यासाठी त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सन्मान पुरस्कार जनजागर यात्रेचे आयोजन केले आहे.